# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्र. ६१

क्र. झोपुप्रा/अभि/
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई : ४०० ०५१.

दिनांक : १२/०१/२००४

वाचा : परिपत्रक क्रमांक नं. १५/झोपुप्रा/सचिव/१४१/२००३ दिनांक ०२/१२/२००३.
परिपत्रक क्रमांक नं. /झोपुप्रा/सचिव/६४/२००३ दिनांक ०६/१२/२००३.

## परिपत्रक

वरील निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकात अंशत: फेरफार करून खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गतचा नविन प्रस्ताव स्वीकृत करताना संबंधीत अभियंत्यांनी आवश्यक दस्त ऐवज / कागदपत्र यांची तपासणी करून छाननी शुल्क स्वीकारण्याबाबत त्यांचे अभिप्राय नोंदवून कागदपत्र जनसंपर्क कक्षाकडे पाठविण्यात यावीत. जनसंपर्क विभागाने त्यांची नोंदणी करून सबंधितास स्वीकृती द्यावी व तद्नंतर कागदपत्र अभियांत्रिकी विभागाकडे छाननी शुल्क स्वीकृतीसाठी पाठविण्यात यावे.

अभियांत्रिकी विभागाने परिशिष्ट - २ उपजिल्हाधिकारी विभागाकडे व परिशिष्ट - ३ वित्त नियंत्रक विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत व परिशिष्ट - १ सह अभियांत्रिकीच्या प्रस्तावावर छाननी करण्यात यावी.

एल.ओ.आय. मु. का. अ. (झोपुप्रा) यांच्या मंजूरीसाठी सादर करण्यापूर्वी परिपत्रक - १५ मधील आदेशाप्रमाणे सचिव (झोपुप्रा) ह्यांच्या आदेशासाठी सादर करावेत.

वरील आदेश मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत असून सदर आदेश तत्काळ अंमलात येत आहेत.

सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

C:\SUREKHA\December 2003\Paripatrak - 1.doc1